# वसई विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

**कार्यालय:- वसई विरार शहर महानगरपलिका नवीन इमारत, सातवा मजला, म्हाडा कॉलनी रोड, यशवंत नगर,विरार (प.)४०१३०३.**
ईमेल: mohvvcmc@gmail.com

जावक क्र. वविशम/वैआवि/२०७९/२०२४-२५ दिनांक:- २६/०९/२०२४

# आदेश

ज्या अर्थी, मृत्युबाबत आगाऊ निर्देश नसताना, 'जेव्हा एखाद्या व्यक्तीस बरे होण्याची आशा नसते आणि त्याला रुग्णालयाव्दारे जीवन समर्थन प्रणाली/ उपचार चालू ठेवले जातात, तेव्हा वरील स्थितीत सदर जीवन समर्थन प्रणाली मागे घ्यावी का? याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी MISCELLANEOUS APPLICATION NO.१६९९ OF २०१९ IN WRIT PETITION (CIVIL) NO. २१५ OF २००५, COMMON CAUSE (A REGD. SOCIETY Petitioner (S) VERSES UNION OF INDIA Respondent (S) INDIAN SOCIETY OF CRITICAL CARE MEDICINE Applicant या प्रकरणी दिनांक २४.०१.२०२४ रोजी आदेश पारित केलेला आहे.

ज्या अर्थी मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या वरील आदेशाच्य अंमलबजावणी करताना, मृत्युबाबत आगाऊ निर्देश दिलेल्या/निष्पादित केलेल्या व्यक्तीस त्याच्या सन्मानपूर्वक मृत्यूच्या हक्काचा अपेक्षित हेतू साध्य करण्याकामी या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी मा. जिल्हा न्यायाधीशाव्दारे नियुक्त केलेल्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (JMFC) यांनी निष्पादित केलेल्या 'आगाऊ निर्देशाची (Advance Directives)' एक प्रत स्थानिक शासन किंवा महानगरपालिका किंवा नगरपालिका किंवा पंचायत यांच्या सक्षम अधिकाऱ्याकडे जतन करण्यासाठी सुपूर्द करावयाची आहे. उपरोक्त संदर्भात स्थानिक प्रशासन सदर दस्तऐवज जतन करुन त्यांच्या संरक्षणामध्ये (Custody) ठेवण्याकरिता सक्षम अधिकाऱ्याची Custodian म्हणून नियुक्त करेल असे निर्देश आहेत.

ज्याअर्थी, डॉ. भक्ती दीपक चौधरी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी,गट-अ हे वसई विरार शहर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी वर्ग १ या पदावर कार्यरत आहेत. तथापि सद्यस्थितीत कार्यरत असलेले वैद्यकीय आरोग्य अधिकारी Transfer/ बदलले गेल्यास नवीन वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची जबाबदारी राहील.

त्याअर्थी, मी, अनिलकुमार पवार, आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका, महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, वरीलप्रमाणे प्रथम श्रेणी दंडाधिकारी (JMFC) यांच्याकडून प्राप्त होणारे आगाऊ निर्देश (Advance Directives) हे दस्तऐवज जतन करण्याकामी डॉ. भक्ती दीपक चौधरी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी,गट-अ, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने, कॉमन कॉज (नोंदणीकृत संस्था) विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या याचिकेमधील दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी संरक्षक (Custodian) म्हणून नामनिर्देशित करत आहे. त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २४.०१.२०२४ रोजीच्या वरील आदेशाच्या अधीन राहून याबाबत कर्तव्य व जबाबदारीने कामकाज पहावे.

संबंधितांनी या आदेशाची नोंद घ्यावी.

सही/-
अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका